**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक ०५ ऑक्टोबर २०२३**

**ठळक बातम्या**

1. **मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला राज्यातील आरोग्य व्यवस्थेचा आढावा, राज्यातील आरोग्य विषयक परिस्थितीबाबत काँगेस पक्षाचे राज्यपालांना निवेदन.**
2. **हवामानाच्या अचूक अंदाजाचा शेतकरी मच्छीमारांना मोठा फायदा: केंद्रीय मंत्री रिजिजू यांचे महाबळेश्वर मेघ भौतिकशास्त्र प्रयोगशाळेला भेटीप्रसंगी प्रतिपादन.**
3. **राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी रजनीश शेठ यांची नियुक्ती.**
4. **आशियाई क्रीडास्पर्धांमधे भारताची आजवरची सर्वाधिक पदकांची कमाई, ८३ पदकांसह भारत पदकतालिकेत ४ थ्या स्थानी.**

********

मुख्यमंत्री आढावा

राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालये, महापालिका आणि नगरपालिकांची रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि वैद्यकीय महाविद्यालयाच्या अखत्यारितील रुग्णालयांना तात्काळ भेट देऊन पाहणी करावी आणि सद्यस्थितीचा अहवाल सादर करावा, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. महत्त्वाच्या बैठकांसाठी आज सकाळी नवी दिल्ली येथे आलेल्या शिंदे यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधून राज्यातील आरोग्य सुविधांचा आढावा घेतला. यापुढे जिल्हाधिकाऱ्यांनी नियमितपणे शासकीय रुग्णालयांना भेटी देण्याच्या स्पष्ट सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. नांदेड आणि घाटी येथील रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्यस्तरीय समिती नेमण्यात आली असून दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही शिंदे यांनी यावेळी दिला.

विजय वडेट्टीवार

आरोग्यासह विविध समस्या हाताळणीत राज्य सरकार सपशेल अपयशी ठरले असल्याची टीका विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वात राज्यपाल रमेश बैस यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. राज्यात औषधांचा तुडवडा निर्माण झाल्यामुळे शासकीय रुग्णालयात रुग्णांचा मृत्यू होत असतानाच विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या शिष्टमंडळाने राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली. आपल्या मागण्यांचे निवेदन देताना राज्यात आरोग्य सुविधांची तातडीने उपलब्धता, कंत्राटी भरती, आंदोलकांवर कारवाई, दुष्काळी परिस्थिती, महिलांवरील अत्याचार अशा विविध मुद्यांकडे शिष्टमंडळाने राज्यपालांचे लक्ष वेधले. राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये झालेल्या

मृत्यूसंदर्भात निवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीची नेमणूक करावी. तसेच प्रत्येक मृत व्यक्तिंच्या कुटुंबियांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची आर्थिक मदत करावी अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय तरुण बेरोजगारांची समस्या, स्पर्धा परीक्षा, ओबीसी आरक्षण, इत्यादी मुद्द्यांचा देखील निवेदनात समावेश आहे.

किरेन रिजिजू

हवामान क्षेत्रातील अत्याधुनिक संशोधनाचा आणि त्यातून दिल्या जाणाऱ्या अचूक अंदाजाचा फायदा देशभरातील शेतकरी आणि मच्छीमारांना होत असून गेल्या 9 वर्षात या क्षेत्रात भारताने अधिक दमदार कामगिरी केल्याचे प्रतिपादन केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्री किरेन रिजिजू यांनी आज महाबळेश्वर इथे पत्रकार परिषदेत बोलताना केले. महाबळेश्वर इथल्या अति उंचावरील मेघ भौतिकशास्त्र प्रयोगशाळेला भेट देऊन पाहणी केल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मानवी आयुष्यावर थेट परिणाम करणाऱ्या ढगांचा अधिकाधिक अभ्यास होण्याची गरज असल्याचे स्पष्ट करतानाच महाबळेश्वर इथल्या या प्रयोगशाळेच्या अत्याधुनिकीकरणासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही रिजिजू यांनी यावेळी दिली. अत्याधुनिक संशोधनामुळे हवामान संशोधन क्षेत्रात भारताची वाटचाल आत्मनिर्भरतेच्या दिशेने सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हवामानाच्या अचूक अंदाजाबरोबरच समुद्रात कुठे आणि कधी कोणत्या जातीचे मासे अधिक प्रमाणात मिळतील, याचाही अचूक अंदाज हवामान विभागाकडून दिला जाऊ लागला असून त्याचा फायदा मच्छीमारांना मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे रिजिजू म्हणाले.

हवाई रुग्णवाहिका

राज्यात आवश्यक तिथं हेलिपॅड उभारणीसाठी तसंच हवाई रुग्णवाहिका सुविधा सुरू करण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेडला मध्यवर्ती संस्था म्हणून काम करता येईल, असा निर्णय या कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. कंपनीचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. बैठकीत मुख्यमंत्र्यांनी शिर्डी, अमरावती, कराडसह विविध विमानतळांच्या विकासकामांचा आढावा घेतला. राज्यात शक्य असेल त्या ठिकाणी रात्री विमान उतरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

रजनीश सेठ

राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी रजनीश शेठ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी ही नियुक्ती केली आहे. त्यांची ही नियुक्ती पदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून सहा वर्षांसाठी किंवा वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत असेल, असं शासनानं म्हटलं

आहे. शासनाचे मुख्य सचिव मनोज सैनिक यांनी या संदर्भातली अधिसूचना प्रसिद्ध केली आहे.

आशियाई क्रीडा

भारतानं आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये आज आणखी दोन सुवर्णपदकं जिंकली आहेत. स्क्वॅशमध्ये दिपीका पल्लीकल, हरिंदर पाल सिंह यांनी मिश्र दुहेरीमध्ये विजेतेपद मिळवलं आहे. ज्योती सुरेखा, आदिती गोपीचंद, परनित कौर यांच्या धनुर्विद्या कंपाऊंड संघानं चीनी ताईपेईच्या संघावर अंतिम फेरीत मात केली. कुस्तीमध्ये ५० किलोग्राम वजनगटात पूजा गहलोतनं आज उपांत्य फेरीत स्थान मिळवलं. भारतीय पुरुष कबड्डी संघानं चीनी तैपेईवर मात करुन उपांत्यफेरीत प्रवेश केला. बॅडमिंटनमध्ये पी. वी. सिंधूला उपउपांत्य फेरीत तसंच कुस्तीमध्ये अंतिम पंघालला पराभवाचा सामना करावा लागला. या स्पर्धेमध्ये आतापर्यंत २० सुवर्ण, ३१ रौप्य आणि ३२ कास्य पदकांसह एकूण ८३ पदकं जिंकून भारत चौथ्या स्थानावर आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतली भारताची ही आतापर्यंतची सर्वोत्कृष्ट कामगिरी आहे.

राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज मागवले आहेत. पात्र क्रीडापटू, प्रशिक्षक, संस्था आणि विद्यापीठांनी येत्या २ नोव्हेंबरपर्यंत संकेतस्थळावर अर्ज पाठवावेत, असं आवाहन क्रीडा मंत्रालयानं केलं आहे. यासाठीच्या पोर्टलवरच ऑनलाइन अर्ज करायचे असून, अंतिम मुदतीनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

जिल्हा परिषद भरती

जिल्हा परिषद नागपूरच्या सरळसेवा भरतीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून येत्या ७ ऑक्टोबर रोजी वरिष्ठ सहायक लेखा, ८ ऑक्टोबर रोजी सांख्यिकी-विस्तार अधिकारी, १० ऑक्टोबर रोजी कृषी विस्तार अधिकारी आणि आरोग्य पर्यवेक्षक, तर ११ ऑक्टोबर रोजी निम्न श्रेणी लघुलेखक आणि कनिष्ठ लेखा सहायक या पदांसाठी परीक्षा घेण्यात येणार आहे. परीक्षेचे वेळापत्रक आणि प्रवेश पत्रक nagpurzp.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

आयसीसी विश्वचषक

क्रिकेटरसिकांचं लक्ष लागूनराहिलेली आयसीसी मर्यादित षटकांची क्रिकेट विश्वचषक स्पर्धा आजपासून सुरू होत आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट मैदानावर इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या सामन्यानं या स्पर्धेची सुरुवात झाली. प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंड संघानं ९ गडी बाद २८२ धावा केल्या असून, न्यूझीलंड समोर जिंकण्यासाठी २८३ धावा करण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे. भारताचा पहिला सामना

रविवारी आठ ऑक्टोबर रोजी चेन्नईच्या एमए चिदंबरम मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे.

मेरी माटी, मेरा देश'

मेरी माटी, मेरा देश' अभियानांतर्गत यवतमाळ नगरपरिषदेनं तयार केलेला अमृत कलश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना सुपूर्द करण्यात आला. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी इतर अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी या कलशाची शोभायात्रा काढली.

जनसंपर्क कार्यक्रम

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, ८ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. खामला चौकाजवळील ज्युपिटर शाळेच्या बाजूला गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. ते नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरूपात आणि आवश्यक कागदपत्रं जोडून आणाव्यात तसेच आपली लेखी निवेदने द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

खोटे प्रमाणपत्र

चंद्रपूर मनपा आरोग्य विभागात झालेल्या कंत्राटी भरतीदरम्यान अनुभवाचं खोटे प्रमाणपत्र सादर करून दिशाभूल आणि फसवणूक केल्याबद्दल दोन उमेदवारांविरुद्ध महानगरपालिकेद्वारे सिटी पोलीस स्टेशन गांधी चौक येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. रिक्त पदांची अथवा कंत्राटी पदांची भरती दरम्यान कुठल्याही प्रकारची खोटी कागदपत्रे सादर करून उमेदवारांनी आपल्या भविष्याचे नुकसान न करून घेण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

स्टँड अप इंडिया

केंद्र शासन पुरस्कृत `स्टँड अप इंडिया` योजनेअंतर्गत अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गाला एकूण प्रकल्प किमतीच्या पंचाहत्तर टक्के रक्कम कर्ज म्हणून मिळते आणि पंचवीस टक्के रक्कम स्वत: भरावी लागते. आता या घटकाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेत, या पंचवीस टक्क्यांपैकी पंधरा टक्के अनुदान समाज कल्याण विभाग देणार असल्याची माहिती विभागाद्वारे देण्यात आलं आहे.

धरणे आंदोलन

राज्य शासन शालेय आणि उच्च शिक्षणात दररोज नवनवीन शासन निर्णय घेऊन शिक्षण क्षेत्रात अराजकता निर्माण करत असल्याचा आरोप करत त्याचा निषेध करण्यासाठी उद्या शुक्रवार, 6 ऑक्टोबर रोजी उपसंचालक, शालेय शिक्षण विभाग,

धंतोली, नागपूर येथे दुपारी 3 ते 5 वाजेदरम्यान सर्व संघटनाव्दारे धरणं आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात सर्व शैक्षणिक विद्यार्थी, पालक संघटनांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे सरकार्यवाह रवींद्र फडणवीस यांनी केले आहे.

सुधीर मुनगंटीवार

छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा लंडनच्या भूमीत उभारण्यासाठी आपण व्यक्तिशः आणि राज्य सरकार पूर्ण सहकार्य करेल, असे प्रतिपादन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. ब्रिटनच्या व्हिक्टोरिया ॲण्ड अल्बर्ट संग्रहालयाशी यशस्वी करार केल्यानंतर मुनगंटीवार यांचा लंडनच्या स्थानिक मराठी बांधवांनी सत्कार केला. दरम्यान, सामंजस्य करार झाल्यानंतर अतिशय देखणा सांस्कृतिक कार्यक्रम यावेळी आयोजित करण्यात आला.

*****